## दिनांक 26/04/2025

**1.** तळा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 24/04/2025 रोजी 08:10 वा ते दि. 25/04/2025 रोजी 08:10 वा च्या दरम्यान मौजे खांबीवली बस स्टॉप येथे आरोपीत रा खांबीवली घनगरवाडी ता तळा याने फिर्यादी व त्यांची पत्नी साक्षीदार क्र 1 यांना खांबवली बस स्टॉप येथे बोलावुन आरोपीत रा खांबीवली घनगरवाडी याचे फिर्यादी याच्याकडे शिल्लक असलेले 2000/- रू दिले नाही या गोष्टीचा मनात राग घरुन आरोपीत याने फिर्यादी याचे दोन्ही हातावर, पाठीवर, कमरेवर व साक्षीदार क्र. 1 हिचे उजवे हाताचे मनगटावर लाकडी काठीने मारहाण करून दुखापत करुन मारहाणीतुन फिर्यादी यांना सोडविण्याकरीता आलेले साक्षीदार क्र 02 व साक्षीदार क्र 03 असे सर्वाना आरोपीत याने शिवीगाळी करुन मारण्याची धमकी दिली.

याबाबत तळा पोलीस ठाणे गुरनं.16/2025, भा न्या सं कलम 118 (1) 115,352 ,351(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/मिलिंद खीरिट हे करीत आहेत.

**2.** पाली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 03/04/2025 रोजी 02:35 वा च्या सुमारास मौजे खुरावले फाटा येथील जॉयव्हीला साईट समोर खोपोली पाली रोडवर ता.सुधागड येथे आरोपी चालक,रा.कुर्णे खाकेवाडी ता.लांजा जि. रत्नागिरी हा उल्हासनगर येथून रत्नागिरी येथे जाण्यासाठी त्याची पत्नी रा.कुर्णे खाकेवाडी ता.लांजाजि. रत्नागिरी हिस सोबत घेवून त्यांच्याकडील हुन्डाई आय 10 कार क्रमांक एम.एच.08 बीई.1585 हिने खोपोली रोडने प्रवास करीत असताना दिनांक.03/04/2025 रोजी रात्रौ 02.35 वाचे सुमारास मौजे खुरावले फाटा येथील जॉयव्हीला साईट समोर आलेवेळी त्याने रस्त्याचे परीस्थीतीकडे दुर्लक्ष करून वाहन हयगयीने निष्काळजीपणने बेदरकारपणे चालवुन अचानक ब्रेक लावल्याने कार रस्त्याचे उजव्या बाजुला खाली उतरून पलटी मारुन अपघात होवून सदर अपघातात त्याची पत्नी हिच्या गंभीर स्तरुपाच्या दुखापतीस व तिचे मत्यूस तसेच गाडीच्या नुकसानीस कारणीभुत झाला.

याबाबत पाली पोलीस ठाणे गुरनं. 37/2025, BNNS 106 (1) ,281,125 a, 125 b, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहा.फौज/विष्णू पाटील हे करीत आहेत.

**3.** नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत दिनांक23/04/2025 रोजी 21:20 वा च्या सुमारास मौजे आंबेघर गावचे हद्दीत अलिबाग ते नागोठणे हायवे रोडवर, रोहा, येथे आरोपीत चालक

रा.वाघोशी ता. सुधागड याने त्याचे ताब्यातील केटीएम मोटारसायकल नं एम.एच.06/सीजी 7143 ही अतिवेगात चालवुन रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून रॉंग साईडला येवुन मोटारसायकल नं एम.एच.06/बीजे 6104 हीस अलिबाग ते नागोठणे हायवे रोडने येत असताना मौजे आंबेघर गावचे हद्दीत मोटार सायकलला ठोकर मारून अपघात करून अपघातात फिर्यादी यांचे उजवे पायाला गंभीर दुखापत व स्वतःचे किरकोळ दुखापती होण्यास व दोन्ही वाहनांचे नुकसानीस कारणीभुत झाला.

याबाबत नागोठणे पोलीस ठाणे गुरनं.38/2025, भारतीय न्याय संहिता कलम 2023 281,125(a),125(b),184 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/संजीता सानप हे करीत आहेत.

**4.** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 15/07/2023 रोजी 17:30 वा ते दि. 21/04/2025 रोजी 17:30 वा च्या सुमारास आरोपी नं 2 याने महिला फिर्यादी यांना धमकी देवुन त्यांचे सोबत सन 2023 पासुन ओळख करुन जबरदस्ती भेटण्यास व बोलण्यास भाग पाडले तसेच सन 2024 मध्ये फिर्यादी हया त्यांचे आईचे घरी असतांना घरी कोणी नसल्याचे पाहुन आरोपी नं 2 याने घरात येवुन फिर्यादी यांचे बरोबर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. तसेच दिनांक 21/04/2025 रोजी फिर्यादी पायी चालत जात असतांना आरोपी नं 2 याने अंधाराचा फायदा घेवुन फिर्यादी यांना मागुन मिठी मारली तसेच आरोपी नं. 1 याने फिर्यादी यांचे माहेरच्या घरी जावुन फिर्यादी यांना आरोपी नं. 01 यांचे बरोबर लग्न लावुन देतो परंतु अधुन मधुन माझेशी शारीरिक संबंध ठेवावे लागतील अशी दमदाटी करुन फिर्यादी यांचा जबरदस्तीने विनयभंग करुन त्यांचे मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं. 127/2025, भा.न्या.सं.2023 चे कलम 74,75, 76, 78,79,351(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोसई सरिता मनवर हे करीत आहेत.

**5.** अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 25/04/2025 रोजी 12:00 वा च्या सुमारास मौजे घरत आळी ता अलिबाग येथे फिर्यादी रा. .रुम नं.11 नेपोली देवी चाळ, आचार्य धर्मसुरीश्वरजी मार्ग,कुरार विलेज,मालाड ईस्ट मुंबई त्यांची पत्नी व मुलगी असे फिर्यादी यांच्या मोठया मुलीस घरी घेवुन जाण्याकरीता आरोपी रा. घरत आळी ता.अलिबाग याचे घरी गेले असता आरोपी यास त्या गोष्टीचा राग येवुन त्याने त्याचे उजव्या हातातील स्टीलचा कडा फिर्यादी यांच्या डोक्यात मारुन फिर्यादी यांना दुखापत केली तसेच फिर्यादी यांना शिवीगाळी करुन लाथाबुक्याने मारहाण केली.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं. 74/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 118(1),115(2),352 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/जाधव हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 25.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 242 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,94,500/-रुपये इतका दंड आकारला आहे.